International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

Original Article

# शाश्वत विकास गरज आणि महत्व

**प्रा. डॉ. अनिल कांबळे**
*अर्थशास्त्र विभाग ,ल.भा.पा. महिला महाविद्यालय, सोलापूर*

**Manuscript ID:** IJAAR-B130388
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 576 - 578**

**Submitted:** 18 Jan.2026
**Revised:** 03 Feb. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*प्रा. डॉ. अनिल कांबळे*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322639

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.20322639

Creative Commons

OPEN ACCESS

***प्रस्तावना:***

*शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमानातील गरजा पूर्ण करतो, पण भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड करत नाही; म्हणजेच पर्यावरणाची हानी न करता, नैसर्गिक संसाधनांचा वापर अशा प्रकारे करणे की ती संसाधने भावी पिढ्यांसाठीही उपलब्ध राहतील, यावर भर देणारी संकल्पना होय. यात आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल साधणे महत्त्वाचे असते, जेणेकरून दीर्घकाळ टिकणारी अवस्था निर्माण होईल.*

*शाश्वत विकासाचे उद्दिष्ट म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करून समाजाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारणे. हे पर्यावरण, समाज आणि अर्थव्यवस्था यांच्यात संतुलन राखून विकासाकडे एक स्थिर आणि सुरक्षित मार्ग प्रदान करते. जर आपण शाश्वत विकासाच्या तत्त्वांचे पालन केले तर आपण केवळ आपल्या वर्तमान गरजा पूर्ण करू शकणार नाही तर भविष्यातील पिढ्यांसाठी एक सुरक्षित आणि समृद्ध भविष्य देखील सुनिश्चित करू शकू. शाश्वत विकासाचा हा मार्ग आपल्याला सांगतो की एक चांगले जग निर्माण करण्यासाठी आपल्याला आपले पर्यावरण, समाज आणि अर्थव्यवस्था एकत्रितपणे सुधारण्याची आवश्यकता आहे.*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*प्रा. डॉ. अनिल कांबळे. (2026). शाश्वत विकास गरज आणि महत्व. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 576 - 578.* https://doi.org/10.5281/zenodo.20322639

**शाश्वत विकासाची व्याख्या :**

**पर्यावरण आणि विकास विषयक आयोगाच्या मते,** “असा विकास जो वर्तमानकालीन लोकांच्या गरजा भाविण्याबरोबरच भविष्यकालीन लोकांच्या, पिड्यांच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड करीत नाही.”

**डेविड पिअर्स याच्या मते,** 'शाश्वत विकास म्हणजे सामाजिक उद्दिष्टांची बेरीज होय. त्यात दरडोई वास्तव उत्पन्नात बाढ, आरोग्य व पोषणात सुधारणा, शैक्षणिक प्रगती, संसाधनांच्या वापराचा अधिकार, उत्पन्नाचे योग्य वाटप आणि स्वातंत्र्यात वाढ होते.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

**संशोधनाची उद्दीष्ट्ये:**

१.शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. शाश्वत विकासाच्या घटकाचा अभ्यास करणे.

३. भारतातील शाश्वत विकासाच्या समस्या आणि आव्हानाचा अभ्यास करणे.

४.शाश्वत विकास लक्ष्यावर आधारीत भारताच्या कामगिरीचा अभ्यास करणे.

५.शाश्वत विकासाची उद्दीष्ट्ये घेणे समजून .

**संशोधन पद्धती:**

या संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. संसोधानासाठी माहिती सकलन करताना क्रमिक पुस्तकें संदर्भ ग्रंथ , वर्तमान पत्रे, मासिके , इंटरनेट साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. इत्यादीच्या आधारे हा संशोधन पेपर लिहिण्याचा प्रयत करण्यात आलेला आहे.

**संशोधन मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे शाश्वत विकास या विषयाशी निगडित व मयीदित आहे. या संशोधन लेखनामाठी शब्द मर्यादा असल्याने महत्वाच्या मुद्यावर वरच प्रकाश टाकण्यात आला आहे .

**विषय प्रतिपादन:**

संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने जागतिक पर्यावरण व विकास आयोगाची १९८३ स्थापना केली . या आयोगाने १९८७ मध्ये आपला अहमाल जाहीर केला. या अहवालात शाश्वत विकासाची व्याख्या देण्यात आलेली आहे. "शाश्थत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांची स्वत: च्या गरजा भागवण्याची क्षमता धोक्यात न आणता वर्तमानातील गरजा आगवू शकतो."

**शाश्वत विकसासाठी पुढील बाबीचा विचार केला आहे:**

**भविष्यातील पिढ्यांचा विचार:** आजच्या विकासाचा परिणाम भविष्यातील पिढ्यांवर होऊ नये, हे सुनिश्चित करणे.

**नैसर्गिक संसाधानाचे जतन :** संसाधनांचा अतिवापर टाळून त्यांचा योग्य आणि मर्यादित वापर करणे.

**पर्यावरणपूरक विकास :** पर्यावरणाला हानी न पोहोचवता विकास साधणे, जसे की पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

**संतुलन :** आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांमध्ये संतुलन राखणे. वरील बाबी विचारात घेवून आर्थिक विकास अपेक्षित आहे

**शाश्वत विकसासाठी पुढील बदल होणे आवश्यक आहे:**

**१. लोकसंख्या वृद्धीदरात घट:** जागतिक लोकसंख्यावाढ कमी केली पाहिजे . लोकसंख्येवरील नियंत्रण करण्यासाठी संबंधित काययाची कठोर अमलबजावणी केली पाहिजे.

**२. उर्जेची नवीन साधने:** उर्जेची नवीन साधने निर्माण केली पाहिजेत पारंपारिक उर्जा साधनाचा त्याग करून नवीन साधने वापरात आणली पाहिजे .

**३.नैसर्गिक साधन सामग्रीचा पर्याप्त वापर :** नैसर्गिक संसाधनाचा वापर शाश्वत पद्धतीने करणे गरजेचे आहे. भावी पिढीच्या कल्याणाचा विचार करून नैसर्गिक साधन संपतीचा काटकसरीने वापर केला पाहिजे. वाढत्या शहरीकरणामुळे व बदलल्या जीवनशैली मुळे कचरा वाढत आहे याची विल्हेंचाट योग्य पद्धतीने लावली पाहिजे.

**४.आर्थिक बदल :** आर्थिक विकासाबरोबरच पर्यावरणाचा विचार करणारी अर्थव्यवस्था निर्माण केली पाहिजे. पर्यावरण

प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी शिक्षण दिले पाहिजे . वृक्षलागवड प्रत्येक व्यक्तीला सक्तीचे केले पाहिजे. शासनाने शासनाने प्रदूषण नियंत्रण कायदे कठोर केले पाहिजेत . बाहनावर प्रदूषण कर आकार पाहिजे.

**५. राजकीय धोरणात बदल :** पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून सर्व घटकाचा सक्रिय सहभाग स्वीकारणारी राजकीय व्यवस्था गरजेची आहे. धोरण निर्मितीत महिला आणि तरुणांचा सहभाग वाढला पाहिजे. शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे साक्षणासाठी सामुदायिक भूमिकेतून कार्य केले पाहिजे. विकासाच्या योजनाच्या, धोरणात्मक निर्णय आणि मानवी दृष्टिकोण याची न्याय तत्वावर मांडणी केली पाहिजे.

**६. नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनात बदल :** अखिल मानवाला शाश्वत विकासाचे महत्व पटण्यासाठी त्यांच्या दृष्टिकोनात बदान करून मनुष्य व निसर्ग यांना भिन्न न मानता त्याचे पस्पर अवलंबित्व स्विकारणारा दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. निसर्गापासून दूर गेलेल्या मनुष्याला पुन्हा निसर्गाकडे आकर्षित केले पाहिजे.

**शाश्वत विकासाचे महत्व :**

शाश्वत विकास महत्त्वाचा आहे कारण तो केवळ सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करत नाही तर भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध भविष्य देखील सुनिश्चित करतो. आजच्या वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्या आणि नैसर्गिक संसाधनांच्या अत्यधिक शोषणाच्या परिस्थितीत, शाश्वत विकास ही एक गरज बनली आहे. जर आपण नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकी वापर करत राहिलो तर भावी पिढ्या या संसाधनांचा वापर करू शकणार नाहीत आणि जीवनासाठी मूलभूत गरजांचे संकट निर्माण होईल**. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी** शास्वत विकास महत्वचा आहे. **पर्यावरण संरक्षण करण्यासाठी** शास्वत विकास महत्वचा आहे. **भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षितता निर्माण करण्यासाठी** शास्वत विकास महत्वचा आहे . **आर्थिक स्थिरता** निर्माण **करण्यासाठी** शास्वत विकास महत्वचा आहे**. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी** शास्वत विकास महत्वचा आहे. आणि सर्व सामन्याच्या **जीवनमानात सुधारणा करण्यासाठी** शास्वत विकास महत्वचा आहे.

**निष्कर्ष :**

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी शाश्वत विकास हा कणा आहे. आर्थिक प्रगतीसोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समता साधल्यासच भारत खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्र बनेल. आज घेतलेले शाश्वत निर्णय उद्याच्या पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करतील. त्यामुळे विकसित भारतासाठी शाश्वत विकासाची गरज अत्यंत महत्त्वाची व अपरिहार्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१.साठे मधुसूदन :-आशियातील अर्थव्यवस्था , डायमंड पब्लिकेशन,पुणे

२. डॉ. एस .व्हि. ढमढेरे :- शाश्वत विकास आणि भारत, डायमंड पब्लिकेशन, पुणे

३.डॉ.प्रतिमा शांताराम कदम :- शाश्वत विकास ध्येय: ओळख. नित्या प्रकाशन, भोपाळ